# मूलभूत भूमिका

**पर्श्वभूमी:**

देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या आसपास जन्माला आलेली पहिली पिढी वीस वर्षानंतर तरुण झाली होती, वयात आली होती. १९६२ साली चीनचे आक्रमण झाले. भारताचा दारुण पराभव झाला. तरुण पिढीचा मनोभंग झाला. देशात काँग्रेसची एकमुखी व एकपक्षीय राजवट चालू होती. विरोधी पक्ष विकलांग होते. तरुणांनी राजकारणातली ढोंगबाजी पाहिली, सामाजिक अन्याय पाहिला. सत्तारुढ काँग्रेस पक्षाचा ताबा सरंजामदारी शक्तीनी आणि घराणेशाहीने घेतलेला. दलितांवर व महिलांवर घोर अन्याय होत होते. शिक्षणक्षेत्रात अनाचार माजलेला. निरक्षर पालकांची मुले प्रथमच महाविद्यालयात शिकूलागली होती. पंचवार्षिक योजनांमधून सर्वांगीण विकासाचे उद्दीष्ट साध्य होण्याऐवजी विषमता वाढत होती. श्रीमंताचा मुठभर वर्ग अधिक श्रीमंत होत होता. कष्टकरी गरीब वर्ग शतकानुशतके दारिद्रयाच्या सापळ्यात अडकलेला. रोजगार, अन्न, पाणी यासाठी तो हैराण होता.

ग्रामीण भागात गावगाडा पध्दतीची अर्थव्यवस्था व सरंजामशाही प्रभावी होती. जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठत्वावर आधारलेली सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांची श्रेणीबध्द अपरिवर्तनीय व्यवस्था चालू होती. प्रत्येक दुष्काळानंतर शेतमजुर जगण्यासाठी खेडी सोडुन शहरात स्थलांतर करत. शहरात झोपडपट्ट्या नावाचे नरक उदयाला येत होते. शहरे बकाल बनत चालली होती. खेडी ओस पडत होती. शहरात महागाईच्या विरोधात आणि अन्नसाठी मोर्चे निघत. सरकार गोळीबार, लाठीमार, धरपकड करुन लोकांचे उठाव दडपून टाकत असे. ग्रामीण भागात व शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये निरक्षरता, अंधश्रध्दा, परंपरा यांच्या आधाराने अंधःकार टिकून होता. अधूनमधून धर्माच्या नावावर दंगली होत होत्या.

## युक्रांदची स्थापना व इतिहास:

या पार्श्वभूमीवर, उच्च शिक्षण घेणारा देशभरातील महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकवर्ग वैफल्यग्रस्त व अस्वस्थ होता. देशात विद्यार्थ्यांच्या दंगली होऊ लागल्या होत्या. बंगाल, आंध्र प्रांतात बंडखोर तरुण नक्षलवादी बनले होते. प्रस्थापितांविरुध्द ते सशस्त्र संघर्ष करु लागले होते.

१९६५ साली पुण्यात 'युथ ऑर्गनायझेशन' या संघटनेची स्थापना झाली. कोणत्याही राजकीय पक्षाची ही युवक आघाडी नव्हती. तिचा नव्या मार्गाचा शोध चालू होता. जयप्रकाश नारायण या महान व्यक्तिमत्त्वाच या गटाशी संपर्क आला. त्यांच्या निमंत्रणावरुन या संघटनेने १९६७ सालच्या बिहारच्या भीषण दुष्काळात गया जिल्ह्यात जाऊन मदतकार्य केले. दुष्काळाच्या आपतीत काम करताना कार्यकर्त्यांचा अनुभव समृध्द झाला. संघटितरीत्या काम करण्यामुळे आत्मविश्वास वाढला. समाजाचे विश्वरुप दर्शन तर झालेच; पण सामाजिक जाणिवा वाढल्या.

तरुणांच्या या समुहाला तत्कालीन राजकीय पक्षांचे आकर्षण वाटत नव्हते. आपल्या नैतिक प्रेरणांची पूर्ती करण्यासाठी त्यांना नव्या संघटनेची गरज वाटत होती. १९६७ सालच्या नोव्हेंबर महिन्यात चार दिवसांचे सामुदायिक चिंतन करुन या गटाने **युवक क्रांती दल** या संघटनेची स्थापना केली. जातिविहीन, शोषणमुक्त, न्यायावर आधारलेला, विज्ञाननिष्ठा समर्थ भारत निर्माण करण्याची त्यांनी एकजुटीने प्रतिज्ञा केली. बंधुता, समता या मूल्यांवर आधारलेला तेजस्वी व सर्जनशील भारतीय समाज निर्माण करण्याचा त्यांचा संकल्प होता. शस्त्रनिरपेक्ष सामुदायिक पुरुषार्थाच्या मार्गाने समाजबदल घडवून आणण्याची त्यांनी ठरवले. 'जनतानिष्ठ राष्ट्रवाद' ही या गटाची धारणा होती.

१९६७ ते १९७७ या दशकात युक्रांद जोमाने वाढले. अनेक युवक आंदोलने युक्रांदने यशस्वी केली. जनजागृती, जनसंघटना व सत्याग्रही संघर्ष ही त्रिसूत्री होती. कृतिशीलतेमधून नवा विचार विकसीत होत होता. नव्या विचाराने नवे उपक्रम, कृती, आंदोलने, संघर्ष होत होते.

विविध आंदोलनामध्ये सत्याग्रह करुन कारावास पत्करलेल्या कार्यकर्त्यांची संख्या लाखाच्या आसपास असेल.

संघटनेने ग्रामीण परिवर्तनाची नवी प्रज्ञावली शोधण्याचा निर्णय घेतला. युक्रांदने आज्ञावलीची कार्यपध्दती त्याज्य मानली होती. १९७४ सलच्या नोव्हेंबर महिन्यात नगर, जिल्ह्यातील राशीन (ता. कर्जत) या गावातील दलित वस्तीमध्ये कम्युनची स्थापना झाली. 'राशीन कम्युन' मध्ये युक्रांदचे पुर्णवेळ कार्यकर्ते एकत्र राहत. कम्युनच्या अनुभवातून ग्रामीण भागात सम्यक परिवर्तनाची कार्यपध्दती सापडली, नवी प्रज्ञावली विकसित झाली.

युक्रांदचे प्रेरणास्त्रोत व मार्गदर्शक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली १९७४ साली देशभर युवकांची आंदोलने सुरु झाली. ते 'लोकनायक' या स्थानावर आरुढ झाले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या कॉंग्रेस पक्षाच्या शासनाने दडपशाही चालू केली. २६ जुन १९७५ रोजी इंदिराजींना देशावर आणीबाणी लादली. नागरिकांची मूलभुत स्वातंत्र्ये रद्दबादल झाली. शासनाने वृत्तपत्र स्वातंत्र्यावर घाला घातला. त्यांच्यावर सेंसॉरशिप लागु झाली. आणीबाणी १९ महिने चालू होती. जवळपास पाच लाख विरोधी कार्यकर्ते कारावासात स्थानबध्द होते. युक्रांदचे सक्रिय कार्यकर्ते आणीबाणीनंतर काही काळ भूमिगत होते. नंतर सर्वांना पकडण्यात आले.

## विलय:

१९७७ साली मार्च महिन्यात लोकसभेच्या निवडणुका झाल्या. जनता पक्षाचे केंद्र सरकार स्थापन झाले. आणीबाणी रद्द झाली. युक्रांदचे मार्गदर्शक लोकनायक जयप्रकाश नारायण यांनीच देशभर इंदिरा शासनाच्या विरोधात १९७४ साली आंदोलन छेडले होते. युक्रांदने जे. पी. आंदोलनात हिरिरीने भाग घेतला होता. जयप्रकाशजींच्या पुढाकारामुळे विरोधी पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन झाला आणि जनतेला इंदिरा गांधीना पराभूत करण्याची संधी मिळाली. त्यामुळेच देशात लोकशाहीची पुनर्स्थापना झाली. जनता पक्षाचा पाया फक्त कॉंग्रेसविरोधी, इंदिराविरोधी हा होता. भिन्न व परस्परविसंग प्रेरणांच्या राजकीय गटांचा जनता पक्ष पुढे आपल्या अंगभूत विसंगतींचा शिकार बनला आणि अंतिमतः विसर्जित

झाला.

१९७७ साली लोणावळा येथे युक्रांदचे नववे शिबिर झाले. त्यात भिन्न मत प्रवाह निर्माण झाल्यामुळे नेतृत्वस्थानी असलेले लोक संघटनेबाहेर पडले. संघटनेची फूट टाळण्यासाठी नाइलाजाने त्यांना बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा लागला. पुढे काही वर्ष युक्रांद चालू राहिले; पण त्याची गतिमानता संपुष्टात आली होती.

## वैशिष्ट्ये:

लोक युवक क्रांती दलास 'युक्रांद' या नावाने आणि संघटनेच्या सक्रिय सभासदांना 'युक्रांदीय' म्हणून ओळखत. युक्रांदमध्ये नेते नियुक्त केले जात नसत. वार्षिक शिबिरात खुल्या चर्चेअंती आखलेल्या धोरणांनुसार जे कृती करण्यास पुढाकार घेत आणि ज्यांना जन आंदोलनात शासन प्रदीर्घ काळ कारावासात ठेवत असे, ते आपोआप युक्रांदच्या नेतृत्व संचात सामील होत. नेतृत्व गी प्रक्रिया असते अशी संघटनेची मान्यता होती.

चातुर्वर्ण्य व जानिसंस्था याला युक्रांदचा कडवा विरोध होता. सवर्णांच्या शोषक एकजुटीमधून भारतामधील ८५ टक्के मागास जातिसमूहांची उपेक्षा, अवहेलना व शोषण निरंतर चालू राहिले. जातीय जाणिवेमधून मुक्त झाल्याशिवाय कुणीही सार्वजनिक जीवनात इष्ट घटना घडवण्यास पात्र होत नाही. ही युक्रांदची ठाम धारणा होती. १९७३ साली पुरीच्या शंकराचार्यांबरोबर पुण्यात दोन दिवस युक्रांदचा जाहीर वादविवाद झाला होता. सार्वजनिक जीवनात जातीय समीकरणाचा युक्रांदने आधार घेण्याऱ्यांचा संघटनाअंर्तगत व बाहेर सतत तीव्र विरोध केला. दलितांच्या मुक्तिलढ्यांना युक्रांदच्या चळवळीत अग्रस्थान होते. त्यात सवर्ण युवक हिरिरीने सहभागी होत. त्यामुळे संघटनेअंर्तगत जातिपातीच्या भिंती कोसळून कार्यकर्त्यांमध्ये बंधुभाव निर्माण होई. जन्माने लाभलेल्या जातीचा युक्रांदीय जाहीररीत्या त्याग करीत. आंतरजातीय विवाहांना युक्रांदचा पाठींबा होता.

स्त्री-पुरुष समानता हा युक्रांदच्या धारणेचा महत्वाचा घटक होता. सामाजिक कार्यात संघटनेला कार्यकर्त्यांकडून समयदान व आम जनतेकडून आर्थिक दान सतत मागावे लागते. अदिन्यदान स्वीकारायचे नाही असा युक्रांदचा निर्णय होता. अदिन्यदान म्हणजे जे दान

स्वीकारले तर हमखास कार्यनाश होतो असे दान! ज्याला संघटनेचे कार्य, उद्दिष्ट, संकल्प मनोमन मान्य असतात, त्याच्याकडूनच दान घ्यावे. ज्याला ते अमान्य असते, त्याच्याकडून अल्प दान स्वीकारले तरी ते कार्यनाशास कारणीभूत ठरते. याबाबत युक्रांदने कठोरपणे नियमपालन केल्याने सतत यश प्राप्त झाले.

## पुन्हा सुरुवात:

चोवीस वर्षांचा काळ लोटल्यानंतर युक्रांद पुन्हा गतिमान करावे असा विचारप्रवाह युक्रांदियांमध्ये सुरु झाला. ठिकठिकाणी प्रदीर्घ बैठका व चर्चा झडू लागल्या. आपल्या मूळ नैतिक प्रेरणांशी सुसंगत असा एकही राजकीय पक्ष वा एकही संघटन सध्या अस्तित्वात नाही असे सर्वसाधारणपणे सर्वांचे एक मात बनले. त्यासाठी युक्रांद नव्या रुपात, नव्या शैलीत गतिमान करण्याचा निर्णय झाला. नव्या रुपातले युक्रांद आताच्या युवक पिढीचे स्पंदन असावे असे ठरले. सर्वसंमतीने ही जबाबदारी युक्रांदच्या मूळ संस्थापकांवर टाकण्यात आली. ९ ऑगस्ट २००१ रोजी क्रांतिदिनाच्या दिवशी पुण्यातील लोकमान्यांच्या वास्तूमध्ये खुले अधिवेशन घेऊन नव्या युक्रांदची अधिकृत घोषणा करावी असे ठरले. त्या निर्णयानुसार आज युक्रांद नव्या रुपात सुरु होत आहे.

## राजकीय परिस्थीती:

भारतीय जनतेने स्वातंत्र्याच्या संग्रामात असीम त्याग केला. स्वतःच्या सर्वांगीण मुक्ततेसाठी, विकासासाठी व नव्या सार्वभौम, आधुनिक राष्ट्राच्या बांधणीसाठी संसदीय लोकशाही निर्णय प्रक्रीयाच उपयुक्त ठरेल या विश्वासाने जनतेने ज्जतिधर्माच्या पलीकडे जाऊन गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे भारत स्वतंत्र झाल्यानंतर राज्यघटना तयार करताना या लोकशाही शक्तींची दखल घ्यावीच लागली आणि राज्यघटनेत जनतेच्या लोकशाहीवादी आकांक्षा व्यक्त झाल्या. नव्या जमान्यात आपले स्थान शाबूत ठेवण्यासाठी प्रस्थापित व सत्ताधारी वर्गालाही लोकशाही प्रणालीत अभिप्रेत असलेले नागरिकांचे मूलभुत हक्क व संसदीय निर्णयप्रक्रिया यांना मान्यता द्यावी लागली. भारतीय राज्यघटना ही ८५ टक्के जनतेच्या दास्यमुक्तीचा दस्तावेजच आहे.

प्रस्थापित वर्ग अडचणीत अल्यावर राज्यघटनेची मोडतोड करु पाहतो. बंधमुक्त झालेल्या व होत असलेल्या लोकशाही शक्तीचे दमन करू लागतो आणि नागरिकांच्या मूलभुत स्वातंत्र्यावर घाला घालतो. हे जमले नाही तर तो वर्ग सामान्यांच्या धार्मिक भावना चेतवून जनतेत फूट पाडून आपले स्थान सुरक्षित राखतो. भारताला धार्मिक भेदभावाचा प्रश्न मूलतः जातिसंस्थेचा व चातुर्वर्ण्याधिष्ठित सामाजिक उतरंडीचा आहे. प्रस्थापित वर्ग आपले शोषकाचे स्थान प्रभावशाली ठेवण्यासाठी कधी समाजवादीच्या नावाखाली मक्तेदार भांडवलशाहीचा, कधी खाजगीकरणाचा, तर कधी धार्मिक / जातीय दंगलींचा आश्रय घेतो. आपली रणनीती सफल करण्यासाठी जो राजकीय नेता वा जो पक्ष दलाल बनायला तयार असेल त्याला प्रस्थापित वर्ग आर्थिक बळ देतो. सध्या सर्वच राजकीय पक्ष दुसऱ्या राजकीय पक्षापेक्षा वेगळा नाही. जातीय समीकरणे हा सर्व पक्षांचा राजकीय आधार आहे. विशिष्ट जातीय समीकरण हे पक्षांचे बाह्यांग असते. बाह्यांग वेगवेगळ्या समीकरणांचे; पण अंतरंग सर्वांचे सारखे!

राजकीय पोकळी निर्माण झाली, राजकीय नेतृत्वाचा नैतिक आधार संपुष्टात आला की, माफिया टोळ्यांचा प्रभाव वाढतो. आता तर राजकीय पक्ष स्वतःच माफिया बनण्याच्या दिशेने वेअगाने वाटचाल करत आहेत. काही पक्ष एका नेत्याच्या टोळीच्या स्वरुपात, तर काही अनेक टोळ्यांच्या स्वरुपात काम करतात. काळा पैसा हा राजकीय नेत्यांचा व पक्षांचा

प्राणवायु बनला आहे. धर्मांधता, जातीयवाद, काळा पैसा व गुन्हेगार यांचे आश्रयस्थान बनलेले राजकीय पक्ष हाच लोकशाही व्यवस्थेला खरा धोका आहे. कोणत्याही पक्षात अंतर्गत लोकशाही उरलेली नाही. सामाजिक न्याय, समता, परिवर्तन यांची बांधीलकी मानणे, राज्यघटनेतील व लोकशाही प्रणालीमधील मूल्ये धारण करणे हे राजकीय पक्षांचे खरे कर्तव्य! ते त्यापासून दूर गेले आहेत. ज्यांनी लोकशाही धारण करायची, त्यांच्याच अंतःकरणात प्रथम लोकशाहीचा मृत्यू होतो. नंतर ती जनतेमधून लोप पावते असा इतिहासाचा दाखला आहे.

विचारवंत गोंधळलेले आहेत. त्यांना भारतीय वास्तवाचे अचूक अवलोकन होण्यात अडचण आहे. पण ज्या सामान्य भारतीय जनतेने प्रस्थापितांचे सहकार्य नसताना ब्रिटिशांविरुद्धचा लढा एकाकीपणे झुंजवला व अंतिमतः यशस्वी केला, ती सामान्य जनता आजच्या वांझ राजकीय चौकटीतून बाहेर पडून नवे मार्ग शोधील, नवे तत्वज्ञान निर्माण करील यावर युक्रांदची श्रद्धा आहे. सामुदायिक संघर्षाच्या मार्गाने एकेका खेड्यात सामान्य जनता व युवक एकजुटीने गावगाड्याचा, सरंजामदारी मनोवृत्तीचा, चातुर्वर्ण्याचा, जातिसंस्थेचा, गरीबीचा व भ्रष्टाचाराचा शर्थीने मुकाबला करुन समतेचा, बंधुतेचा, न्यायाधिष्ठित, विकसनशील, समृद्ध अन एकात्म समाज निर्माण करतील हे आमचे भाकीत आहे.

१९९४ साली ७३वी घटनादुरुस्ती झाली. ग्रामसभा म्हणजे गावची सार्वभौम संसद हे ठरले. आता सामान्य ग्रामस्थाला निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येण्याची आवश्यकता नाही. गावातला प्रत्येक मतदार कायद्याने गावापुरता कायमस्वरुपी आमदार बनलेला आहे. ग्रामपंचायत, पूर्वापार चालत आलेली वतनदारशाही आणि कंत्राटदार हे सारे ग्रामसभा मृत ठेवतात. ग्रामसभा जिवंत करणे, निरंतर जागृत ठेवणे हाच ग्रामक्रांतीचा संग्राम आहे. हा संग्राम यशस्वी करुन सामान्य जनता गुलामगिरीतून मुक्त होऊन ग्रामस्वराज्य स्थापन करील. भारतीय जनक्रांतीचा गर्भ ग्रामक्रांतीच्या पोटातच वाढेल. त्यासाठी प्रचलित राजकीय पक्ष कुचकामी आहेत. ग्रामक्रांतीच्या मार्गाने संसदीय लोकशाहीमधील अधिकार, कर्तव्ये व प्रक्रिया प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरवून भारतीय जनता आपला विकास साधील. ग्रामक्रांती कृषिक्रांतीलाही चालना देईल.

वैश्विकीकरण व खाजगीकरण या माध्यमातून आंतरराष्ट्रीय भांडवलशाही भारतात अवतरत आहे. विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व विश्व व्यापार संघटना यांची प्रभुसत्ता प्रभावी होत आहे. त्यांच्या प्रभुसत्तेसमोर राष्टाचे सार्वभौमत्व दिवसेंदिवस निस्तेज बनत आहे. कालांतराने ते अस्तंगत होण्याचाही धोका संभवतो. सत्ताधारी वर्ग व आंतरराष्ट्रीय भांडवलदार यांची अभद्र युती झालेली असल्याने आगामी काळात गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे.

तंत्रज्ञान स्वतः समाजघातक नसते. श्रमिकांचे क्लेश कमी करते, वस्तूंचे संख्यात्मक उत्पादन वाढवते आणि उत्पादन खर्च कमी करते. परंतु कोणत्याही अर्थव्यवस्थेत सामान्य माणसाची क्रयशक्ती सतत वाढवावी लागते. ते घडले नाही की, भांडवलशाही पुढे पेचप्रसंग निर्माण होतो. तेव्हा भांडवलशाही व्यवस्था आर्थिक अराजक माजवते. या अराजकामधून स्वतःचा बचाव करण्यासाठी हुकुमशाहीवर विश्वास असणारे लोक सत्ताधीश बनण्याचा प्रयत्न प्रस्थापित वर्गाकडून केला जातो. आगामी काळातील निवडणुकांमध्ये परकीय कंपन्या भारतीय दलालांमार्फत आपल्या भांडवली शक्तीचा प्रभाव पाडणार यात शंका नाही.

अणुबॉंब केल्यानंतर भारताचे सामर्थ्य व सुरक्षितता यात वाढ होण्याऐवजी घट झाली आहे. पाकिस्थानकडेही अणुबॉंब आहे. भारतीय उपखंड अणुयुद्धाच्या छायेत आला आहे. कारगील युद्ध घडवण्याची हिंमत पाकिस्थानने केली याचे कारणही, अणुयुद्धाच्या विनाशकारी परिणामांना घाबरुन भारत लष्करी कारवाईची व्यापकता वाढवणार नाही याची खात्री, हेच होते.

## गंभीर आर्थिक परिस्थिती:

साठ टक्के भारतीय उद्योग बंद पडले आहेत. विकासाचा वेग मंदावला आहे. देश कर्जबाजारी होऊन परकीय कर्जाच्या सापळ्यात अडकला आहे. विकासाचा प्रादेशिक असमतोल व सामाजिक विषमता वाढत आहे. सरकारी तिजोरीत खडखडाट आहे. बेकारीचे प्रमाण स्फोटकरीत्या वाढत आहे. वैश्विकीकरणाला जसा अंध विरोध असू नये, तसेच आंधळेपणाने त्याचे स्वागतही होऊ नये.

कोरिया, सिंगापूर, मलेशिया, चीन, जपान आदी देशांनी वैश्विकीकरणाचे लाभ सजगपणे व प्रयत्नपूर्वक प्राप्त केले आहेत. त्यांनी पारंपारिक ढिसाळ, अकार्यक्षम कार्यसंस्कृतीचा त्याग केला. नवी कार्यक्षम कार्यसंस्कृती स्वीकारली. आत्मसात केली. आज ते देश उत्पादन वाढवून, उत्पादनखर्च कमी करुन अथक परिश्रमाने इतर देशांच्या बाजारपेठांत श्रीमंत राष्ट्रांच्या स्पर्धेत उतरले आहेत. आपण मात्र परकीय भांडवलाला निमंत्रण देत राहणे, परकीय कर्जे काढणे आणि अनिर्बंध आयात करणे एवढाच जागतिकीकरणाचा अर्थ लावला आहे. अर्थव्यवस्था आत्मनाशाच्या दिशेने चालली आहे.

लोकसंख्या वाढीचा वेग एतर देशांनी परिश्रमाने रोखला. आपण मात्र वेगाने लोकसंख्या वाढवत आहोत. येत्या काही वर्षात भारत लोकसंख्येत चीनला मागे टाकणार आहे. लोकसंख्येची वाढ रोखण्यासाठी गांभीर्यपूर्वक उपाययोजना आवश्यक आहे. अशा गंभीर आर्थिक परिस्थितीमध्ये भ्रष्टाचार करुन विकासाला मारक बनणारा कुणीही माणूस संवेदनाशून्य व देशद्रोही मानायला हवा.

पं. नरसिंह रावांनी अर्थव्यवस्थेचे दरवाजे आंतरराष्टीय भांडवलशाहीला खुले केले. शेअरच्या किंमती भरमसाठ वाढू लागल्या. शेअर बाजारात तात्पुरती तेजी आली. या परिस्थितीत मध्यमवर्गीयांनी आपल्या आयुष्याची बचत शेअर बाजारात गुंतवायला सुरुवात केली. शेअर बाजारातील तेजी ही रोगट अर्थव्यवस्थेला आलेली सूज होती हे आता सिध्द झाले आहे. हर्षद मेहतासारख्या एका मामुली दलालाने पाच हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला. मध्यमवर्गीयांचे पैसे परदेशात पळवून नेण्यात आले. यु. टी. आय. चे प्रकरण झाले. सामान्यांचे हजारो कोटी रुपये बडण्याचा धोका निर्माण झाला आहे. एंरॉन प्रकरणाने जनतेच्या डोळ्यात अंजन घातले. आपण ज्यांना खांद्यावर घेऊन नाचतो, ते पुढारी स्वतःच्या लाभापोटी परकीयांचे हस्तक बनतात हे उघड झाले आहे.

पर्यावरणाचा नाश करुन विकासाची धोरणे आखली तर विकासाला धोका निर्माण होतो. शाश्वत विकासाची पर्यायी विकासनीती आखणे आवश्यक आहे. मोठी धरणे बांधून, लाखो लोकांना विस्थापित करुन देशबांधवांना देशोधडीस लावले जात आहे. मूठभरांचा

विकास गरिबांना बळी देऊन करायचा या विकासनीतीला युक्रांदचा तीव्र विरोध राहील.

पर्यावरणाचा विनाश होतो या सबबीखाली ज्या औद्योगिक प्रकल्पांना श्रीमंत देशात बंदी आहे, त्या प्रकल्पांना गरीब देशांमध्ये पाठवले जाते. अणुऊर्जा निर्मितीनंतर उरणारी, घातक द्रव्ये असलेली अणुराख अविकसित देशात कचरा म्हणून टाकण्यात येते. ही सारी मानवताद्रोही कृत्ये आहेत. अशा धोरणांमधून श्रीमंत व गरीब देशांमधील दरी रुंदावत जाणार आहे.

केवळ पुस्तकी अर्थशास्त्रज्ञ आजारी अर्थव्यवस्थेचे निदान करुन उपाययोजना करूगी शकतील असे वाटत नाही. लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष व त्यांचे पुधारी यांनी तर अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक असलेली राज्कीय इच्छाशक्ती गमावलेली दिसते. दरिद्री जनतेच्या गंभीर समस्यांकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. मानवतावाद हा ज्यांच्या विचारप्रणालीचा घाभा आहे, अशा अर्थशास्त्रज्ञांनी नीतिमूल्यांचा विचार प्रधान मानून स्वच्छ व सुस्पष्ट मांडणी केल्यास त्यांचे ज्ञानात्मक काम समाजोपयोगी ठरु शकेल. विकसनशील देशातील सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करताना केवळ अर्थशास्त्रीय सैध्दांतिक मांडणी पुरणार नाही. राज्यकर्त्यांच्या प्रवृत्तींचा, नीतिमत्तेचा, सामाजिक-राजकीय परिस्थितीचा, लोकांच्या श्रध्दांचा सखोल अभ्यास करुन त्या घटकांची आर्थिक प्रश्नांशी सांगड घालणे महत्वाचे आहे. लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या संस्थांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास आर्थिक व सामाजिक प्रश्नांचे सत्य स्वरुप समजण्यासाठी आवश्यक आहे. संस्थात्मक अर्थशास्त्राचा पुरस्कार केला पाहिजे. राज्यकर्त्यांमध्ये बोकाळलेला लाचखोरपणा व आत्मकेंद्रित वृत्ती ही कारणे गरीब देशातील आर्थिक विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत.

भारतात तत्त्वज्ञान व घोषणा यांचा प्रचार व प्रत्यक्ष आचार यांच्यामध्ये मोठी दरी आहे. सर्वच नेते दांभिक व अप्रामाणिक आहेत, असे नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व सामाजिक न्याय ही आधुनिक जीवनाची तत्त्वे त्यांना मान्यही असतात; परंतु मध्ययुगीन मानसिकतेत जगणाऱ्या; चुकीच्या सामाजिक परंपरांना, समजुतींना, भाबड्या श्रध्दांना कवटाळून बसलेल्या भोवतालच्या अफाट जनसमुदायाला पुढे नेण्याचा मार्ग त्यांना दिसत नाही. त्यामुळे केवळ घोषणा देऊन असे नेते सतःचे समाधान करतात, स्थितप्रज्ञासारखे वागतात. आर्थिक धोरणे राबवण्यासाठी नव्या ठोस तत्त्वज्ञानाची बैठक व राजकीय कौशल्य आवश्यक असते. ते भारतीय नेतृत्वाने आत्मसात केलेले नाही. भारतीय राजकारणात ध्येयवाद, तत्त्वज्ञान, सेवा, त्याग यांचे महत्त्व उरलेले नाही. बलवान गटांची आपापसातील चुरस, धनदांडग्यांचे प्राबल्य असे राजकारणाचे कुरुप चित्र आहे. त्यामुळे बहुसंख्य दरिद्री जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी लागणारा आत्मविश्वास राजकीय नेत्यांनी गमावला आहे.

८५ टक्के जनता गरीबीमधून मुक्त होऊ इच्छिते; तथापि तिच्यासाठी आयत्या विकासाचे ताट कुणी वाढणार नाही. या जनशक्तीला गतिशील व कृतिशील केल्यानंतर आणि ती शक्ती मध्ययुगीन मानसिकतेला, आपल्यामधील अंधःकाराला सोडचिठ्ठी द्यायला तयार झाल्यानंतर नवे राजकीय नेतृत्व उदयाला येईल. धनदांडग्यांना मतदान विकणाऱ्या व जातीला मतदान करणाऱ्या आंधळ्या जनतेला उज्ज्वल भविष्य लाभत नसते.

चीनमध्ये हुकूमशाही प्रणालीमुळे विकास साध्य झाला; भारत लोकशाहीच्या सापळ्यात अडकल्यामुळे मागे पडला, असा आपमतलबी प्रचार काहीजण करतात. नोबेल पारितोषिक विजेते प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी हा सिध्दांत खोडून काढला आहे. भारतात जो थोडाफार विकास झाला, तो लोकशाही प्रणालीमुळेच साध्य झाला आहे. शंभर टक्के साक्षरता, कुपोषणाचा अंत, सामान्य जनतेच्या भरणपोषणाची काळजी आणि आरोग्याची देखभाल एवढ्या किमान गोष्टी केल्या तरी भारतात क्रांतिकारक विकास होऊ शकेल असे अमर्त्य सेन यांचे प्रतिपादन आहे.

शेतमालाच्या किंमती हा केवळमोठ्या शेतकऱ्यांचाच प्रश्न आहे, असे म्हणणे योग्य होणार नाही. आपल्या एकुण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३५ टक्के उत्पन्न शेतीमधून निर्माण होते; पण एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. यातील बहुसंख्य दारिद्र्यरेषेच्या खालचे जीवन जगतात. एकूण शेतकऱ्यांपैकी ७५ टक्के शेतकऱ्यांकडे एकूण जमिनीच्या फक्त २५ टक्के जमीन आहे, तर अडीच टक्के खातेदारांकडे २५ टक्के जमीन आहे. ७५ टक्के लोकांची शेती कोरडवाहू आहे. कोरडवाहू शेतीचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. शेतीत उत्पादन वाढले पाहिजे. उत्पादनखर्चावर आधारित किंमत व शेतमालाची निश्चित विक्रि व्यवस्था झाली पाहिजे. निश्चित खरेदी यंत्रणा, साठवणूक व्यवस्था, शेती विकासाची ठाम दिशा, सिंचन, पतपुरवठा, जमीनसुधारणा, मालवाहरुकीसाठी रस्त्यांची सुविधा आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नामधून शेतीवर अधिक खर्चाची तरतूद व्हायला हवी. निसर्गशेतीचा विचारही सर्वदूर पसरला पाहिजे.

सरकारी विकास योजना म्हणजे काही धनदांडगे, आमदार, खासदार, नगरसेवक आणि नोकरशाही यांना पोसण्यासाठी चालवलेला पांजरपोळ बनला आहे. नवश्रीमंत वर्गात करबुडवेगिरी प्रचंड प्रमाणावर बोकाळलेली आहे. श्रीमंताकडून कर गोळा करने आणि गरिबांना आधार देणारे कल्याणकारी राज्य चालवणे हे शासनाचे खरे कार्य असते; परंतु सरकार कल्याणकारी राज्याची जबाबदारी झटकून टाकत आहे. सरकार म्हणजे केवळ प्रशासन यंत्रणा आणि पोलीस, लष्कर यांची दमन यंत्रणा असे समीकरण बनत चालले आहे. कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट सोडून दिले तर शासन म्हणून उरते ती फक्त दंडसत्ता! अशा दंडसत्तेत आणि ब्रिटिश राजवटीत फरक नसतो.

शहरात अचांक श्रीमंत होणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. बहुसंख्य नवोदित श्रीमंत करबुडवे असतात. प्रासिकर अधिकारी याबाबत उदासीन असले तरी गुन्हेगारी जगत मात्र त्यांच्याबाबत दक्ष असते. काळा पैसा बाळगणारे श्रीमंत गुन्हेगारांच्या जाळ्यामधून सुटू शकत नाहीत. खंडणी होळा करणे ही एक सुनियंत्रित व समांतर व्यवस्था बनली आहे. श्रीमंतांनी कर भरला नाही तर देश गरीब राहतोच, परंतु गुन्हेगारी जगाचे आधिपत्य समाजावर पसरु लागते.

**प्रशासन:**

भारतातील सध्याची प्रशासन यंत्रणा १९३० साली ब्रिटिश संसदेने संमत केलेल्या 'INDIA ACT' नुसार निर्माण झालेली आहे. खुद्द इंग्लंडमध्यही अशा प्रकारची जनताद्रोही

प्रशासन यंत्रणा अस्तित्त्वात नाही. साम्राज्यवाद्यांनी गुलामांना काबूत ठेवण्यासाठी ही प्रशासकीय चौकट तयार केली. काही हजार सनदी अधिकारी त्या काळातील चाळीस कोटी भारतीय लोकसंख्येला काबूत ठेवत. भारतीय संसदेने स्वतः कारदा करुन प्रशासन यंत्रणेत आमूलाग्र परिवर्तन केले पाहिजे. कित्येक कायदे कालबाह्य झाले आहेत. सनदी अधिकारी शुध्द बुध्दीचे किंवा भ्रष्टाचारापासून मुक्त नाहीत; पण ते विशेषाधिकार प्राप्त झालेले व कायद्याच्या कचाट्यापाकून मुक्त आहेत. विशेषाधिकार असलेला आय.ए.एस. सनदी, अधिकारी ही संकल्पनाच रद्दबातल ठरवण्याची आता वेळ आली आहे.

सरकारी कर्मचारी सतत स्वतःचे पगार वाढवून घेतात. कामाचे उत्तरदायित्व मात्र त्यांच्यावर नाही. लाच घेतल्याशिवाय सरकारी कागद हलत नाही. लोक शासकीय अधिकाऱ्यांना कंटाळले आहेत. सरकारने गोळा केलेल्या कराच्या रकमेपैकी ७४ टक्के रक्कम आज सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होते. काही वर्षानंतर केवळ सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारावर १०० टक्के खर्च होईल. कारण आयुर्मान वाढल्याने निवृत्तीवेतनाचा खर्च वाढत जाणार आहे. कल्याणकारी राज्य ही संकल्पनाच भविष्यकाळात नामशेष होणार आहे. सार्वजनिक निधी हडप करण्यासाठी प्रशासन व राजकीय पुढारी यांची हातमिळवणी झालेली आहे.

माहितीचा कायदा संमत झाला. पण त्यात खूप त्रुटी आहेत. माहितीच्या अधिकाराचा जनताभिमुख कायदा होणे जरुरीचे आहे. प्रशासनाचा कारभार पारदर्शक असलाच पाहिजे.

## सामाजिक परिस्थिती:

पुर्वी भारतीय समाज ग्रामीण भागात गावगाडा रचनेत जीवन कंठत होता. गावात लोकशाही नव्हती, मालकशाही होती. व्यक्तीला स्वतंत्र स्थान नव्हते. एकत्र कुटुंब, जातपंचायत व मालकवर्ग व्यक्तीच्या जीवनाचे निर्णय घेत. विवाहात साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला नव्हते. विवाहसंस्थेच्या माध्यमातून एका कुटुंबाचे दुसऱ्या कुटुंबाशी संबंध जोडले जात. गाव निरक्षर असे. अपत्यांच्या संख्येवर नियंत्रण नसे. मुलींना शिक्षण देण्याची मानसिकता ग्रामीण जनतेत नव्हती. गावचे मालक व कुटुंबाचे प्रमुख यांच्या पायाशी व्यक्तिस्वातंत्र्य शरणार्थी होते. तरी जगण्याची हमी मात्र दोघांकडून होती.

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर सामाजिक स्थित्यंतर झाले आहे. ती प्रक्रिया अजून चालू आहे. अनेकांनी शहरात स्थलांतर केले. निकृष्ट दर्जाचे जीवन स्वीकारुन का होईना; पण शहरातल्या झोपडपट्ट्यांत जगण्यापुरते आर्थिक जीवन प्राप्त करता येते. गाव सोडल्यामुळे संस्कृतीशी फारकत झाली. बंधने तुटली. काहीजण गुन्हेगारी जगतात सामील झाले. दाऊद इब्राहिम, छोटा राजन अशी अनेक नावे सांगता येतील. ग्रामीण भागात राहून कुणी अचानक श्रीमंत होऊ शकत नाही.

आता ह्या शहरी संस्कृतीने आपल्या गुणदोषांसह ग्रामीण भागात प्रवेश केला आहे. ग्रामीण भागातच नव्या शहरी संस्कृतीची केंद्रे उभी राहत आहेत. मटका, जुगार, दारुचे गुत्ते, बिअर बार, गुंडगिरी यांचा तेथे सुळसुळाट असतो. पोलीस खात्याशी काळ्या धंद्यातील या लोकांची जवळीक असते. काळ्या धंद्यातून उपजीविका करणारा हा वर्ग ग्रामपंचायतीच्या

राजकारणात भाग घेऊ लागला आहे. सहकार क्षेत्र संपूर्ण नासले आहे. ग्रामविकासाचा निधी हडप करणारा नवा कंत्राटदार वर्ग निर्माण झाला आहे. तालुक्याचे विकास अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच व कंत्राटदार यांची भ्रष्टाचारात हातमिळवणी असते. गावगाडा समाजरचनेतला जुना वतनदार निस्तेज झाल्यामुळे ग्रामीण समाजावर दबाव टाकणारा नवा पुढारी वर्ग त्याची जागा घेत आहे. नव्या पुढारी वर्गाचा सामाजिक पाया भक्कम नाही. जुन्या मालकवर्गाच्या हुकुमशाहीला निदान सामाजिक मान्यता तरी होती.

**शिक्षण:**

गेल्या ५-६ वर्षात ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. त्याचे काही बरेवाईट परिणाम होत आहेत. मुलींच्या शिक्षणामुळे कुटुंबात परिणाम होताना दिसतो. परंतु शिक्षणाची गुणवत्ता संपली आहे. बहुसंख्य शिक्षक सावकारकी करतात. ५ टक्के दराने व्याज लावून पैसे कर्जाऊ देतात. पाचव्या वेतन आयोगाने पगार भरमसाठ वाढवले. त्याचा हा परिणाम आहे. चौथी इयत्ता पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांना अक्षर ओळख नसते. शालांत परीक्षेत सर्रास कॉपी चालते. शिक्षक हे आता आदरणीय व्यक्तिमत्व उरले नाही. याचा परिणाम म्हणजे इंग्लिश माध्यमांच्या शाळांचे फॅड ग्रामीण भागातही वाढत आहे. इ. ४ थी पर्यंत मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे. जी शिकावी लागत नाही ती मातृभाषा! याबाबतचे शास्त्रीय सिध्दांत धुडकावून लावून भावी पिढ्या बरबाद करण्याचा शासन, पालक व धंदेवाईक शिक्षणसंस्थाचालक यांनी संयुक्तपणे विडा उचलला आहे.

मराठी विद्यालयांना शासन शिक्षकांच्या पगाराशिवाय अनुदान देत नाही. पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आपल्या पाल्यांसाठी संस्थाचालक मागतील तेवढी फी देतात. मराठी माध्यमाच्या शाळेसाठी मात्र गावकरी व पालक आर्थिक सहाय्य देण्याचे नाकारतात.

शिक्षण सार्वत्रिक होत आहे ही स्वागतार्ह घटना असली तरी त्यातील कस संपलेला आहे. जागतिक स्पर्धेत आपल्या गुनवत्तेवर टिकेल असा तरुण तयार करणे, हे शिक्षणाचे ध्येय सर्वजण विसरले आहेत. महाविद्यालयात मराठी विषयाला माहिती-तंत्रज्ञान हा पर्याय ठेवला आहे. या ना त्या मार्गाने मराठी भाषेचे पध्दतशीर शिरकाण चालू आहे. काही काळानंतर मराठी विषयाचे शिक्षक मिळणार नाहीत. आपल्या शाळा आकर्षक व शिक्षक मुलांवर प्रेम करणारे नाहीत. म्हणून विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण अधिक आहे. जगातल्या निरक्षरांपैकी सर्वात मोठी निरक्षरांची संख्या भारतात आहे.

राष्टाच्या उभारणीमध्ये शिक्षणक्षेत्राची महत्त्वाची भूमिका असते. शिक्षणामुळे आधुनिक मूल्ये समाजात रुजली पाहिजेत. आपल्या हक्कांची व राष्टीय-सामाजिक कर्तव्यांची जाणीव वाढकली पाहिजे. समता, सामाजिक न्याय, बंधुभाव याबाबत जागृती निर्माण झाली पाहिजे, शिक्षणाची संधी व सहभाग वाढवून राष्टनिर्मितीची प्रक्रिया वेगवान करता येते. पण राज्यकर्त्यांचे शिक्षणक्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष चालू आहे. शिक्षण हे संस्कारप्राप्तीचे व जीवनमानाची शाश्वती मिळवण्याचे साधन आहे. परंतु आज विद्यार्थ्यांना या क्षेत्रात मज्जाव करण्याचे सार्वत्रिक धोरण आहे.

## महिलांची परिस्थिती:

भारतीय समाजाला व परंपरेला स्त्रियांची गुलामी मान्य आहे. परंपरेने अखिल स्त्रियांचे शूद्र मानलेले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रियांचे जिणे दुष्कर झाले आहे. त्यामुळे मुलीने जन्म घेऊन आपल्या घरात प्रवेश करु नये असे आईवडिलांना वाटते. गर्भजलपरीक्षेवर कायद्याने बंदी आहे. पण धंदेवाईक डॉक्टरवर्गाने सामाजिक नीतिमत्तेशी फारकत घेतली असल्याने ते ही परीक्षा करतात. मुलगी जन्माला येणार असेल तर डॉक्टरच्या सहकार्याने व बेकायदेशीरपणे गर्भपात केला जातो. महिलांच्या मृत्यूचे प्रमाणही पुरुषांच्या मृत्यूच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे. परिणामतः लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण प्रचंड आहे. भावी काळात लैंगिक अत्याचार, एड्स व समलिंगी संभोग यांचे प्रमाण वाढणार आहे. लिंगभेदाधिष्ठित विषमता प्रभावी होणे समाजघातक आहे.

भारतात अजूनही सर्रास बालविवाह होतात. गर्भाशयाची वाढ पूर्ण होण्याच्या आत आईवर गर्भारपण लादले जाते. अशा परिस्थितीत गर्भपात तरी होतो किंवा कमी वजनाचे मूल जन्माला येते. कमी वजनाची बहुतांश बालके मृत्यु पावतात. जी कशीबशी जगतात, ती मुले निकृष्ट कर्जाचे मेनेजर घेऊन वाढतात. 'जगलो हेच खूप झाले, आता काही करायला नको. ठेविले अनंते तैसेचि राहावे!' ही मानसिकता तयार होते. असे निकृष्ट दर्जाचे नागरिक ही भारताची गंभीर राष्ट्रीय समस्या आहे.

## सांस्कृतिक:

भारत हा विश्वातला सर्वात प्राचीन देश. भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे हेही खरे आहे. विविध जाती, भाषा, पंथ, संप्रदाय, धर्म या भूमीवर हजारो वर्षे नांदत आहेत. एकमेकांच्या आदरणीय व पवित्र गोष्टींचा भारतीय मानूस सहजतेने आदर करतो. हे आपले वैशिष्ट्य जगाच्या पाठीवर अन्यत्र दिसतफ नाही. तथापि कका व्यापक व उदात्त संस्कृतीबरोबरच छोट्या समूहांमध्ये रानटी प्रवृत्ती, प्रथा, परंपरा आढळतात. जातिबध्द समाजरचनेमुळे आपल्या सामूहिक संस्कृतीची आराधना व त्यासाठी सांस्कृतिक उत्थान आवश्यक आहे. शंभर टक्के साक्षरता आणि महिलांना समानतेची वागणूक ही सांस्कृतिक उत्थानाची गुरुकिल्ली आहे. समतेची कास धरुन शंभर कोटी लोकसंख्येचा समूह सुसंस्कृत बनवला तर विश्वातील मानवतेला तो मार्गदर्शक ठरु शकेल.

प्रसारमाध्यमांची भरमसाठ वाढ, दूरचित्रवाणीवरील असंख्य वाहीन्या, त्यातील भ्रामक संघर्षाच्या मालिका आणि अफाट जाहिराती यांमधून एक नवी बाजारु संस्कृती प्रयत्नपूर्वक जोपासली जात आहे. ही आधुनिकोत्तर **(Post Modern)** संस्कृती आहे असे सांगितले जाते. या संस्कृतीमध्ये निश्चित प्रमाण असलेली मूल्ये नाहीत. त्रिकालाबाधित मानवी मूल्यांना या नव्या संस्कृतीच्या माध्यमातून छेद देण्याचा प्रयत्न चालू आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य हेच एकमेव मूल्य आहे हे रुजवण्याचा प्रयत्न आहे. बाजारपेठा काबीज करण्यासाठी व्यक्ती चंगळवादी बनवने ही भांडवलशाहीची गरज आहे. बाजारु संस्कृती कब्जा घेत असल्याने मानवी समाजाची सुसंगत नीतिमूल्ये नष्ट करण्याचा डाव चालू आहे.

## नैतिक / अध्यात्मिक:

जातिसंस्थेमुळे आपली नैतिकता तुकड्या-तुकड्यांचे बनली आहे. सर्व समाजाची धारणा करू शकेल अशी नैतिकता निर्माण झालेली नाही. काही अंशी आध्यात्मिक विचारातून नैतिक विचार व्यक्त होतात. भारतीय माणूस जगण्यासाठी दुहेरी निकष लावतो. प्रत्येक प्राणिमात्रात, जीवसृष्टीत ब्रम्ह आहे, असे म्हणणारा आणि सर्व प्राणिमात्रांचे मंगल होवो असा घोष करणारा भारतीय माणूस माणसांचे विटाळ मानतो. 'वसुधैव कुटुंबकम्' असा नारा देणारा पुढारी निवडणुकीत जातीय समीकरणे करतो. सर्व भारतीय नागरिक समान दर्जाचे आहेत असे मानणे आणि लिगंभेदावर आधारलेल्या विषमतेचा त्याग करणे ही नवी नैतिकता समाजाला आत्मसात करावी लागेल. सार्वजनिक चारित्र्याच्या सामाजिक कल्पनाही फार संकुचित आहेत. सामाजिक व सार्वजनिक जीवनात प्रत्येकाने आणि विशेषकरुन नेत्यांनी शीलपालन केल्याशिवाय समाज गुण्यआगोविंदाने नांदू शकत नाही. अडीच-तीन हजार वर्षांपासून भारवर्षातील महान व्यक्तिमत्त्वांनी याबाबत सखोल विचार केलेला आहे. सत्य, अहिंसा, उपजीविकेपेक्षा अधिक संपत्ती न बाळगणे, कुणा जीवाला पीडा न देणे ही सामाजिक नीतिमत्ता भगवान महावीरांनी, भगवान गौतम बुध्दांनी सांगून ठेवली आहे. सध्या आपले एवढे नैतिक अधःपतन झाले आहे की, भर दरबारात वस्त्रहरण केलेल्या द्रौपदीची मानसिक पीडा आपणास समजू शकत नाही; परंतु दुर्योधनाच्या सत्तेला मात्र आपण सहज वंदन करतो.

समाजाच्या नैतिक अधःपतनाची लक्षणे त्याने स्वीकारलेल्या नेतृत्वावरुन आणि न्यायसंस्थेमधील न्यायाधीशांच्या वर्तनावरुन ओळखता येतात. भ्रष्ट पुढाऱ्यांना समाज डोक्यावर घेताना दिसतो आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांना परिघाबाहेर फेकताना दिसतो. राजकारनात आले नसते तर जे कफल्लक राहिले असते, असे लोक राजकारणाच्या माध्यमातून कोट्याधीश बनले आहेत. सामान्य जनता त्यांना मुजरे करताना दिसते. हे अधःपतन फार व्यापक व गंभीर आहे. न्याययंत्रणेतील खाल्च्या पातळीवरील न्यायाधीशांना किंवा पीठासीन अधिकाऱ्यांना तर लाचखोरीचे व्यसनच लागले आहे. वरिष्ठ न्यायालयाने त्यांची निकालपत्रे वारंवार रद्दबातल ठरवली तरी त्यांना लाज वाटत नाही. वकिलांच्या संघटनेने त्यांच्याविरुध्द ठराव केले तरी त्यांना तमा नसते. न्यायालयाच्या अवमानाच्या कयद्याची कवचकुंडले धारण करुन ही मंडळी लाचखोरीचे व्यसन चालू ठेवतात. लाचखोरीचे व्यसन गर्दच्या व्यसनापेक्षा भयंकर आहे. समाजात सध्या न्याय, सत्य व चारित्र्य बेवारशी आहेत. गी विघतनाची व अधःपतनाची लक्षणे आहेत.

## निष्कर्ष:

भारतातील एकूण आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणीक सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये अनागोंदी माजलेली आहे. दुसऱ्या बाजूला जनसामान्यांमध्ये वाढती जागृती व विकासाची आकांक्षा स्पष्ट दिसते. या परिस्थितीमध्ये जातिविहीन, शोषणमुक्त, गतिशील व निर्भय समाज निर्माण करण्यासाठी सम्यक परिवर्तनाचेच तत्त्वज्ञान अंगिकारावे लागणार आहे. ही ऐतिहासिक जबाबदारी कुणाही जागृत भारतीय नागरिकाला यापुढे टाळता येणार नाही. अन्यथा अराजक व देशाचे विघटन हे भवितव्य अटळ आहे.

सम्यक परिवर्तनासाठी ग्रामीण व शहरी जनतेला कृतिशील बनवण्याचे उत्तरदायित्व स्वीकारुन युक्रांद हे जनसंघटन आम्ही पुन्हा गतिमान करीत आहोत.

## युक्रांदची मुलभूत धारणा:

- माणसामाणसांतील दुरावा नष्ट करुन प्रतेक व्यक्तीला व संपूर्ण समाजाला माणुसकीचे जीवन निर्भयपणे जगता यावे यासाठी युक्रांद अखंडपणे झटत व झगडत राहील.
- मानवजातीला माणूस म्हणून जगण्याकरता सत्याचा अखंड शोध घ्यावा लागेल व सत्याच्या प्रकाशात आपले जीवन सतत घडवावे लागेल. वैश्विकीकरणामुळे व संपर्क साधनांमुळे जग जवळ येत आहे. सर्व धर्म, संस्कृती, संप्रदाय आमनेसामने येण्याचा काळ आला आहे. प्रत्येकाला दुसऱ्याच्या नजरेमधून आत्मशोध घ्यावा लागेल. खरी माणुसकी व सत्य हे नेहमीच अन सर्वत्र निष्कलंक, परिपूर्ण व सम्यक असते. सत्याचे दर्शन घेणाऱ्यांना मर्यादा असतात. निरंतर सत्याचा शोध घ्येण्यावर युक्रांदचा दृढ विश्वास आहे.

  कोणत्याही एका काळी वा क्षणी कोणा एका व्यक्तीला, गटाला, संघटनेला, पक्षाला, पंथाला, संप्रदायाला, धर्माला, वर्गाला, जातीला सत्याचे संपूर्ण आकलन व दर्शन होऊ शकते असे युक्रांद मानत नाही. सत्याचा किंवा इतिहासाचा खरा व अंतिम बोध आपल्यालाच झाला आहे किंवा होत असतो असा दावा कोणी केल्यास युक्रांद अशा नकली व मतलबी प्रेषितांविरुध्द वैचारिक झुंज देईल.
- कोणताही मूलभूत व महत्त्वाचा सामाजिक निर्णय घेताना प्रौढ व्यक्तीला वा गटाला आपले प्रामाणिक माता मांडण्याचा हक्क आहे व तशी संधी त्यांना सदोदित लाभली पाहिजे. त्याकरता प्रत्येक व्यक्तीला वा संघटनेला योग्य ते विचार, उच्चार, आचार व संघटना स्वातंत्र्य मूलभूत म्हणून असले पाहिजेत. कोणत्याही व्यक्तीला, पक्षाला वा गटाला आपले मात म्हणजे दलितांचे, गरिबांचे, जातीचे वा समाजाचे अधिकृत मात असा दावा करुन सामाजिक-राजकीय निर्णयप्रक्रियेची मक्तेदारी मिळवण्यात यश लाभणार नाही, याबाबत क्रांतिशील समाजाला नेहमीच दक्ष राहावे लागणार आहे. याच दृष्टीने सार्वजनिक निर्णय घेताना युक्रांद लोकशाही निर्णय प्रक्रियेचा आग्रह धरील. उघड वा छुप्या हुकुमशाही प्रवृत्तींना युक्रांद प्राणपणाने सतत विरोध करील.
- जोपर्यंत मानवसमाज सर्व प्रकारच्या विषमतेतून, दास्यातून मुक्त होत नाही व जोपावेतो राज्यसंस्था कार्यरत राहणार आहे, तोपर्यंत राज्यसंस्थेच्या कार्याची दखल सर्व जागृत नागरिकांना घ्यावीच लागेल. कारण या ना त्या निमित्ताने ही सत्ता केवळ स्वतःचे हित साधण्यासाठी वापरण्याचा मोह संधिसाधू व्यक्ती, गट, पंथ व राजकीय पक्षांना नेहमीच पडत राहणार आहे. दंडसत्तेने अमानुष बनू नये. माणुसकी, न्याय व स्वातंत्र्य यावर आघात करू नये म्हणून जगभरच्या सर्व शोषितांना, दलितांना व सामान्य जनतेला दोन गोष्टींचे भान ठेवावे लागेल.

एक, राजसत्ता ताब्यात घेऊन तिचे कार्य शोषित जनतेच्या मुक्तीसाठी व त्यांच्या हितासाठी चालवावे लागेल.

दुसरी म्हणजे शासन चालवण्यासाठी जनतेने निवडलेले प्रतिनिधी स्वार्थांध होऊन उन्मत्त भस्मासुराप्रमाणे सामान्य व शोषित जनतेवरच उलटू नयेत यासाठी शोषितांना सतत सावध राहावे लागेल. क्रांतिशील जनता जेव्हा या संदर्भात बेसावध होते, तेव्हा सत्ताधारी पक्ष किंवा पक्षांची आघाडी आणि भ्रष्टाचारी लोकशाही एकजुटीने श्रमिकांची, शेतकऱ्यांची व दलितांची सर्वंकष कठोर फसवणूक कशी करतात याची अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. निरंतर जागरुकता हीच लोकशाही टिकवण्याची किंमत असते.

मानवी प्रतिष्ठेवर आधारलेली संसदीय लोक्शाही निर्णयप्रक्रियाच जनहितासाठी सत्ता राबवू शकेल, राजसत्ता जनतेच्या कह्यात ठेवील आणि जनताद्रोही, वाममार्गी प्रवृत्तींचा निरास करील असा युक्रांदचा दृढ विश्वास आहे

शोषित, पीडित, व दलित जनता इतिहासाच्या व निसर्गाच्या एखाद्या यांत्रिक नियमानुसार आपोआपच सम्यक क्रांती घडवून आण्ते व आपली मुक्ती करुन घेते हा एक भ्रम आहे. सम्यक परिवर्तनाचा विचार जनमानसात रुजावा लागतो. जनतेला डोळसपणे कृतिशील बनवण्यात साहाय्यभूत होण्याचे उत्तरदायित्व कुणाला तरी स्वीकारावे लागते. लोकशाही आकांक्षा व ऐतिहासिक गरज लक्षात घेऊन नवे जीवन व नव्या सामाजिक संस्था यांची उभारणी करण्याचे सामर्थ्य जनतेला प्राप्त होत असते. अशा डोळस लोकशक्तीवर व जागृत लोकमतावर युक्रांदचा दृढ विश्वास आहे.

## संक्लप:

वरील मूलभूत भूमिका मनात सतत वागवत, त्यासाठी आवश्यक असलेले शीलपालन करत, भारतीय वास्तवाशी सतत इमान राखत युक्रांद अखंडपणे काम करत राहील. जातिवर्गविहीन, शोषणमुक्त, माणुसकीच, निर्भय समाज निर्माण करणे हे युक्रांदचे एकमेव ध्येय आहे. हे ध्येय गाठण्यासाठी लोकशक्तीच्या आधाराने शोषण, अन्याय व भ्रष्टाचार करणाऱ्या सर्व सामाजिक अपप्रवृत्ती व शक्ती यांच्याविरुध्द युक्रांद लढा देईल. सामान्य जनतेची स्वातंत्र्यप्रेरणा व न्यायनिष्ठ विवेकबुध्दी जागृत केल्यास सर्व तऱ्हेच्या शोषणाचा व अन्यायाचा प्रतिकार करता येतो. सत्य सक्रिय केल्यास ते सामर्थ्यवान बनते. सत्याची व सामर्थ्याची सांगड घालणे हा युक्रांदचा संकल्प आहे. या संकल्पानुसार एक शिस्तवध्द जनसंघटना म्हणून युक्रांद अहोरात्र कार्यरत राहील.